॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १२ (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि अप थिंक एज्युटेक सर्व्हीस प्रा.लि. यांच्यातील शैक्षणिक सामंजस्य करारावर मंगळवार दि.१२ मार्च रोजी कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या इंटर्नशीपला महत्व देण्यात आले आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एज्युटेक प्रा.लि. ही कंपनी पदवी व पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी तसेच संशोधनासाठी मार्गदर्शन व सहकार्य करते. या सामंजस्य करारान्वये विद्यार्थ्यांना औद्योगिक जगताची ओळख होईल. व्यावसायिक करीअरसाठी आवश्यक असणारे कौशल्य विद्यार्थ्यांना दिले जातील. विद्यार्थ्यांना संशोधन व नोकरी विषयक संधी प्राप्त होणार आहे.

या सामंजस्य करार प्रसंगी कुलसचिव डॉ.विनोद पाटील,संचालक डॉ.राजेश जवळेकर,गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.चौधरी, प्रा.एच.आर.तिडके,प्रा.रमेश सरदार, अप थिंक एज्युकेट प्रा.लि.चे मॅनेजर तेजस जगताप, तुषार जंगले, सुरेखा मोरे, वर्षा पहुजा, ऋषीकेश कुलकर्णी हे उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा बौध्दीक संपदा अधिकार कक्ष आणि रासायनिकशास्त्र प्रशाळा व विद्यापीठाचे नव उद्योजकता केंद्र यांच्या वतीने उद्या दि. १३ मार्च रोजी “बौध्दीक संपदा अधिकारांचे संवेदनीकरण” या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतरच्या सत्रात पुणे येथील लिडेनफ्रॉस्ट इनोव्हेशन प्रा.लि.चे अविष्कार सल्लागार आशुतोष प्रचंड हे बौध्दीक नवकल्पना आणि शोध प्रक्रिया या विषयावर बोलणार आहेत त्यानंतर विद्यापीठाच्या नवउद्योजकता केंद्राचे संचालक प्रा.भूषण चौधरी हे बौध्दीक संपत्तीची मुलतत्वे या विषयावर तसेच डॉ.विकास गीते हे बौध्दीक संपदा अधिकारांचे संरक्षण करण्याची प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात सोनगीर येथील डॉ. रवींद्र धिवरे हे शैक्षणिक क्षेत्रातील बौध्दीक संपदा हक्क दाखल करण्याबाबतचा अनुभव आणि आशुतोष प्रचंड हे बौध्दीक संपदा अधिकारांचे मुद्रीकरण या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा समारोप होणार आहे. अशी माहिती बौध्दीक संपदा कक्षाचे प्रा.डी.जी.हुंडीलवाले, समन्वयक डॉ.विकास गीते यांनी दिली.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कला, वाणिज्य् व विज्ञान महाविद्यालयात पदवीस्तरावर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागु केले जाणार असून त्या पार्श्वभूमीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दि. ८ व १९ मार्च या दोन दिवसात जळगाव,धुळे व नंदुरबार या तीन जिल्हयात ९ महाविद्यालयांमध्ये १०९ महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील बदल प्राध्यापकांनी स्वीकारून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, शैक्षणिक वेळापत्रक तयार करणे याबाबत कार्यशाळेत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार असून प्राध्यापकांच्या शंकांचे निरसन केले जाईल. १८ मार्च रोजी धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनीचे शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव, नहाटा महाविद्यालय,भुसावळ, महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे डॉ. सुरेश पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## जनसंपर्क विभाग

,चोपडा, राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळाचे नानासाहेब यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, चाळीसगांव, एस.एस.व्ही.पी.एस. कला, वाणिज्य् महाविद्यालय, धुळे, येथे ही कार्यशाळा होणार असुन त्या त्या परिसरातील महाविद्यालयांचे प्राध्यापक यामध्ये सहभागी होणार आहेत.

दि.१९ मार्च रोजी सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर, जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार, पुज्य सानेगुरूजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, या ठिकाणी कार्यशाळा होतील. या कार्यशाळांमध्ये प्रा.दीपक दलाल, डॉ.जगदीश पाटील, प्रा.एस.टी. इंगळे, प्रा.अनिल डोंगरे, प्रा.आर.एल.शिंदे, डॉ.यु.एस.जगताप, प्रा.एस.आर.चौधरी, डॉ.एस.एस.राजपूत, डॉ.आर.एस.पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळांचे नियोजन करण्यात आले आहे.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १२ मार्च, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी